# सुखशांती को.-ऑप हौसिंग सोसायटी लि.

रजि.नं. एनबीओएम./ सिडको / एचएसजी.(ओएच)/ ७५२ / जेटीआर /१९९८-९९

सेक्टर -९, बिल्डींग नं. डी-१ ते डी-१०, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९.

संदर्भ क्र. ३९४/२०२५ दिनांक ०३/०२/२०२५

## रविवार दिनांक १९/०१/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सुखशांती को-ऑप हौसिंग सोसायटी लि. या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १९/०१/२०२५ रोजी दुपारी ठीक ०२:०० वाजता न्यु बॉम्बे झोरॅष्ट्रियन असोसिएशन चॅरिटेबल ट्रस्ट हॉल, पहिला मजला, प्लॉट नं.१४/२, सेक्टर-९, कालिकामाता मंदिरासमोर, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९. या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. परंतु पुरेश्या गणसंख्येअभावी नियमानुसार पुढील अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात आली. त्यांनतर ठीक ०२:३० वाजता सभेला सुरवात झाली. सदर सभेस खालीलप्रमाणे सभासद उपस्थित होते.

**उपस्थित सभासद संख्या:- ५४**

प्रथम सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांनी उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले व त्यानंतर सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांना सभेचे सूत्रसंचालन करण्याची विनंती केली त्यावर श्री. शशिकांत चौधरी यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी स्विकारुन, या विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांचे नाव सुचविले व त्यास श्री. भाऊसाहेब ठाणगे यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते या विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांची निवड करण्यात आली.

सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन सभेच्या सूचनेचे सविस्तरपणे वाचन केले. त्यानंतर रीतसर सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात आली.

विशेष सर्वसाधारण सभेच्या दिनांक १०/०१/२०२५ रोजीच्या नोटिसीमध्ये दिल्यानुसार पुढीलप्रमाणे विषय चर्चेसाठी घेऊन ठराव संमत करण्यात आले.

**विषय क्र.१)मागील दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. १** उपरोक्त विषय श्री. महादेव शिंगाडे यांनी सभेपुढे मांडला, व सोसायटीचे कमिटी सदस्य श्री. शिवराज पाटील यांना विनंती केली कि, दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखवावे. त्यावर श्री. शिवराज पाटील यांनी सदर इतिवृत्त सविस्तरपणे वाचून दाखविले. व सदर इतिवृत्त कायम करण्यासाठी सभासदांनी मंजुरी द्यावी असे सभेपुढे सांगितले. त्यानंतर सर्व सभासदांनी एकमताने ठरावास मंजुरी दिली. व दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे सर्वानुमते कायम करण्यात आले.

**"ठराव करण्यात येतो कि, दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सविस्तरपणे वाचून ते सर्वानुमते कायम करण्यात येत आहे."**

**सूचक:-श्री. राजेश दिघे -सदनिका क्र. डी -१/२-१ अनुमोदक:- श्री. निलेश मगर -सदनिका क्र. डी-७/१-१**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सुखशांती को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. नोंदणी क्र. एनबीओएम / सिडको / एचएसजी(ओएच) / ७५२ / जेटीआर / सन १९९८-९९ ★ नवी मुंबई ★

**विषय क्र.२)सोसायटीच्या दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार ५+१(गामी विकासक) यांच्या निविदांची सुधारित अंतिम छाननी करून सोसायटी व्यवस्थापन समितीने निवडलेल्या ३ विकासकांची निवड मान्य करणे.**

**ठराव क्र. २** उपरोक्त विषय सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी सभेपुढे मांडला. त्यावर श्री. शशिकांत चौधरी यांनी श्री. सुनिल खाडे यांना सोसायटीच्या पुनर्विकासाबाबतच्या कामाचे प्रेझेन्टेशन सभेपुढे सादर करावे अशी विनंती केली. त्यावर श्री. सुनिल खाडे यांनी सोसायटीच्या पुनर्विकासाच्या कामात विशेष सहकार्य केल्याबाबत श्री. शशिकांत चौधरी, श्री. राजेश दिघे व सोसायटी संचालक मंडळ यांचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला त्यावर सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन केले. श्री. सुनिल खाडे यांनी पुनर्विकासाचे कामकाज सुरु झाल्यापासून ते आजपर्यंतच्या कामाबाबतचे प्रेझेंटेशन विशेष सर्वसाधारण सभेपुढे मांडले. त्यानंतर विकासकांच्या निविदांची तुलनात्मक तक्त्यामधील माहिती विशेष सर्वसाधारण सभेपुढे दिली.

सोसायटीच्या संचालक मंडळाने सोसायटीच्या दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार निवडलेल्या ६ विकासकांच्या निविदांची सुधारित अंतिम छाननी करून निवडलेल्या ३ विकासकांच्या निविदांची यादी सभेपुढे मांडली.

संचालक मंडळाने निवडलेल्या ३ विकासकांच्या निविदांची यादी पुढीलप्रमाणे:-

**Developers list**

1. Abode Infracon (Neelkanth Group)
2. Tulasi Lifestyle (Prithvi Multiproject)
3. K.T. Homes (K.T. Reality)

त्यानंतर संचालक मंडळाने निवडलेल्या ३ विकासकांच्या निविदांची संपूर्ण माहिती सभेपुढे मांडली. तसेच त्यांची सर्व माहिती सनदी लेखापाल (C A) यांचेकडून तपासून घेणार आहोत असे देखील सभेपुढे सांगितले. सोसायटीचे कमिटी सदस्य श्री. रामचंद्र कदम यांनी के. टी. होम्स व श्री.जी. डेव्हलपर्स या विकासकांच्या निविदांमधील तुलनात्मक माहिती दिली व के.टी. होम्स यांनाच का निवडले याबाबत माहिती सभेपुढे दिली.

सोसायटीचे कमिटी सदस्य श्री.शिवराज पाटील यांनी श्री. सुनिल खाडे यांनी सभेपुढे अतिशय योग्य व चांगल्या पद्धतीने प्रेझेंटेशन दिले आहे त्याबाबत त्यांचे अभिनंदन केले. तसेच संचालक मंडळाने याच ३ विकासकांच्या निविदांची निवड का केली याबाबत आपले मत मांडले.

सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी संचालक मंडळाने या ३ विकासकांची निवड करण्यासाठी केलेल्या वर्कींगबाबत माहिती दिली व सोसायटीच्या संचालक मंडळाने निवडलेल्या ३ विकासकांच्या निविदांची निवड योग्य असल्याचे देखील सभेपुढे सांगितले.

सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी सभेपुढे सांगितले कि, संचालक मंडळाने निवडलेल्या ३ विकासकांच्या निविदांची निवड केलेली आहे त्यास मान्यता द्यावी. त्यावर सोसायटीचे सभासद श्री. भाऊसाहेब ठाणगे यांनी सभेपुढे आपले मत मांडले कि, सोसायटीच्या संचालक मंडळाने केलेली निवड योग्यच असेल त्यामुळे या ३ विकासकांच्या निविदांच्या निवडीस अनुमोदन देत आहे.

सोसायटीच्या सभासद श्रीमती. रचना म्हात्रे यांनी सोसायटी कमिटीने निवडलेल्या विकासकांचे बॅकग्राऊंड, बॅक गॅरंटी, बॅलन्सशीट, आयकर व प्रोजेक्ट व्हिजिट बाबत माहिती विचारली त्यावर श्री.राजेश दिघे यांनी विकासकांनी दिलेली माहिती पुन्हा एकदा सभेपुढे मांडली. तसेच या विकासकांची फायनांशियल माहिती सनदी लेखापाल (C A) यांचेकडून तपासून देखील घेणार आहोत असे श्री. शशिकांत चौधरी सांगितले.

नोंदणी क्र. एनबीओएम / सिडको / एचएसजी(ओएच) / ७५२ / जेटीआर / सन १९९८-९९
नवी मुंबई

श्रीमती. सुनिता वायदंडे यांनी विकासक सेल्फ फंडवर पुनर्विकास करणेबाबत प्रश्न विचारला त्यावर याबाबत श्री.राजेश दिघे व श्री. शशिकांत चौधरी यांनी माहिती दिली. सोसायटीचे सभासद श्री. लीलाधर लोकेश्वर यांनी सोसायटीच्या कमिटीने व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत अतिशय चांगले प्रेझेंटेशन सादर केले त्याबाबत अभिनंदन केले.व विकासकांच्या बांधकाम गुणवत्तेबाबाबत तसेच त्यांच्या दिरंगाई झालेल्या प्रोजेक्टबाबत माहिती घेण्यात यावी असे आपले मत मांडले. त्यावर श्री. राजेश दिघे यांनी त्याबाबत माहिती दिली तसेच श्री. शशिकांत चौधरी यांनी विकासकांच्या बांधकाम गुणवत्तेबाबाबत तसेच विकासकांच्या दिरंगाई झालेल्या प्रोजेक्टबाबत आपण माहिती घेणार आहोत तसेच विकासकांचे प्रोजेक्ट व्हिजिट देखील करणार आहोत असे सभेपुढे मांडले.

श्रीमती. परिधी सोलंकी यांनी श्री.राजेश दिघे, श्री.शशिकांत चौधरी व श्री.सुनिल खाडे यांचे त्यांनी सोसायटीच्या पुनर्विकासाच्या कामाबाबत व सादर केलेल्या प्रेझेंटेशन बाबत त्यांचे अभिनंदन केले. व सोसायटीच्या कमिटीने निवडलेल्या ३ विकासकांच्या निवडीस आपले अनुमोदन दिले.

श्री.पुंडलिक आवटे यांनी सोसायटीच्या कमिटीने निवडलेल्या ३ विकासकांच्या निवडीबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसेच त्यांनी पुनर्विकासाबाबत सोसायटीस पाठविलेल्या ई -मेल बाबत योग्य ती दखल घ्यावी असे सभेपुढे सांगितले. त्यावर सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी सांगितले कि, आपण पाठविलेला ई-मेल सोसायटीचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व कायदेविषयक सल्लागार यांना पाठविलेला आहे व त्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

सोसायटीचे सभासद श्री.चिंतामण गोडसे यांनी सोसायटी कमिटी व श्री.राजेश दिघे, श्री.शशिकांत चौधरी व श्री.सुनिल खाडे यांचे सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत केलेल्या कामाबद्दल अभिनंदन केले.

त्यानंतर सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून सदर विषयास मंजुरी द्यावी असे सभेपुढे मांडले. त्यावर कमिटीने निवडलेल्या ३ विकासकांची निवड सर्वानुमते मान्य करणेत आली.

**"ठराव करण्यात येतो कि, सोसायटीच्या दिनांक २२/१२/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार ५+१(गामी विकासक) यांच्या निविदांची सुधारित अंतिम छाननी करून सोसायटी व्यवस्थापन समितीने निवडलेल्या अबोड इंफ्राकॉन(नीलकंठ ग्रुप), तुलसी लाईफस्टाईल (पृथ्वी मल्टीप्रोजेक्ट) व के. टी. होम्स (के. टी. रिऍलिटी) या ३ विकासकांची निवड सर्वानुमते मान्य करणेत येत आहे."**

**सूचक:-श्री.भाऊसाहेब ठाणगे-सदनिका क्र.डि-६/०-३ अनुमोदक:- श्रीमती.परिधी सोलंकी -सदनिका क्र.डि -४/२-४ व**
**श्री. चिंतामण गोडसे- सदनिका क्र.डि -२/०३**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

श्री. शशिकांत चौधरी व श्री.राजेश दिघे यांनी सोसायटीच्या पुनर्विकासाच्या यापुढील कामकाजाबाबतची माहिती सभेपुढे दिली. यानंतर पुढील १५ दिवसांत उपरोक्त ३ विकासकांची कार्यालये,साईट व्हिजीट तसेच पूर्ण केलेली बांधकामे इत्यादीची पाहणी करण्यासाठी शक्य होईल त्या सर्व सभासदांना आपण घेऊन जाणार आहोत. त्यानंतर सरासरी १६ फेब्रुवारी २०२५ रोजी आपण उपरोक्त ३ विकासकांचे सोसायटीच्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबतचे डिजीटल स्क्रिन प्रेझेन्टेशन पाहणार आहोत असे सभेपुढे सांगितले व त्याप्रमाणे हे सर्वांनी मान्य केले.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी सभासदांच्या सहकार्याबद्दल उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले व राष्ट्रगीत घेऊन सभा संपल्याचे जाहीर केले.

सुखशांती को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. नोंदणी क्र. एनबीओएम / सिडको / एचएसजी(ओएच) / ७५२ / जेटीआर / सन १९९८-९९ नवी मुंबई

**जय हिंद** **जय महाराष्ट्र** **जय सहकार**

**सुखशांती को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.**

अध्यक्ष सचिव खजिनदार